समाजकल्याण विभाग

माहीती

विभागाचे नाव	समाजकल्याण विभाग
विभाग प्रमुखाचे पदनाम	गट विकास अधिकारी
विभागाचा दुरध्वनी क्रमांक	02521-220036
विभागाचा ईमेल	bdotalasari@gmail.com

मागासवर्गीयांचे विशेषत: अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हित संवर्धन करण्यासाठी व सामाजिक अन्याय यापासून त्यांचे संरक्षण करण्याच्या उदात्त हेतूने महाराष्ट्र शासनाने समाज कल्याण विभागाची निर्मिती केली. त्याद्वारे तळागाळातील गावपातळीपर्यंतच्या अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग, अपंग व दुर्बल इ. घटकांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक व कौटुंबिक लाभांच्या योजनांचा लाभ घेता यावा, जेणेकरून त्यांचे जीवनमान उंचाविता येईल व त्यांना सर्व सोयी-सुविधांचा लाभ घेता येईल यादृष्टीने कार्यपध्दती अंमलात आणण्यासाठी समाज कल्याण विभाग सतत प्रयत्नशील आहे. थोडक्यात, समाजातील मागासवर्गीय व दुर्बल घटकांना सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून त्यांचा शैक्षणिक, सामाजिक तसेच आर्थिक विकास करणेसाठी निरनिराळ्या योजना राबविणे हे समाज कल्याण विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे.